**नि.मु.नं. ३९०/२०२५**
**शेषेराव व देवराव व ईतर**

**निशाणी क्र. १४ खालील आदेश.**

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्र.०३ यांनी त्यांचे प्रस्तुत दाव्याकामी असलेले लेखी म्हणणे दाखल करण्याकामी झालेल्या विलंबाकरीता उशिरमाफी करीता अर्ज केला आहे.

२. प्रतिवादी क्र.०३ यांनी अर्जात असे कथन केले की, प्रतिवादी क्र. ०३ यांनी जाणुन—बुजुन जबाबदावा देणेस उशीर केलेला नाही. त्यामुळे, जवाबदावा दाखल करण्याकामी झालेला विलंब माफ होऊन मिळावा अशी विनंती केली.

३. वादीला मुदत देवुन देखील त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल न केल्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्या म्हणणेविना चालविण्यात येत आहे.

४. प्रतिवादी क्र.०३ यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दिवाणी प्रकिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकाराचे म्हणणे दाखल होणे व त्याची योग्य बाजु मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे, न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे प्रतिवादी क्र.०३ यांना त्याची बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेशः—

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.०३ यांना कैफियत दाखल करण्याकामी झालेला विलंब **रू.५००/— (अक्षरी पाचशे रूपये फक्त)** च्या खर्चावर माफ करण्यात येतो.

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.06.16 16:26:10 +0530

ठिकाण—औसा.
दिनांक : १६/०६/२०२६.

**(श्री. पी. पी. आवटे)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, औसा